CMYK

बीड । बुधवार
०२.०७.२०२५
वर्षे : ५ अंक : ९२
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

## लैंगिक अत्याचार प्रकरणातील विजय पवार जवळचे असले तरीही कठोर कारवाई करा: आ. क्षीरसागर

### मस्साजोग प्रकरणाचे दुःख नाही; धनंजय मुंडे यांना मंत्रीपद गेल्याचं दुःख

### एसआयटी मागणीला आमचाही पाठिंबा ; गृहमंत्री फडवणीस व पालकमंत्री अजित पवार यांच्यावर सत्ताधाऱ्यांचा विश्वास नाही का ?

### लवकरच दूध का दूध और पानी का पानी : आमदार संदीप क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील उमाकिरण येथील खाजगी क्लासचे संचालक विजय पवार व प्रशांत खाटोकर यांच्या विरोधात लैंगिक छळ केल्याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हा नोंद होताच दुसऱ्या दिवशीच दोन्ही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या प्रकरणातील आरोपी माझ्या जवळचे असले तरीही जिल्हा पोलीस अधीक्षकांना फोन करून कारवाई करण्याचे आपण सांगितले असल्याचे प्रसार माध्यमांश बोलताना बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी म्हटले आहे. मसाजोग सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आपण लावून धरलेला विषय व यानंतर मंत्रीपद गेल्याचं धनंजय मुंडे यांना दुःख आहे. यामुळेच ते बेताल वक्तव्य करत असल्याचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी म्हटले असून या प्रकरणातील सर्व सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी ताब्यात घ्यावे या प्रकरणात पोलिसांचा तपास योग्य दिशेने सुरू असून मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे या प्रकरणाकडे लक्ष असून एसआयटी स्थापन झाली आहे. सत्ताधाऱ्यांच्या या मागणीला आमच्याही पाठिंबा होता मात्र या प्रकरणात आपण कुठे फरार झालो नाही १५० दिवस आपण कुठे बाहेर नव्हतो यामुळे या गोष्टीचा राजकारण केले जात असल्याचा आरोप

▶▶ उर्वरित पान २ वर

## कर्तव्यदक्ष जिल्हाअध्यक्ष वाढदिवस अभिष्टचिंतन...

**सार्वजनिक जीवनातील लोकाभिमुख दमदार नेतृत्व शेतकरीमित्र तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष...मा.राजेंद्रजी मस्के यांना वाढदिवसाच्या लक्ष लक्ष हार्दिक शुभेच्छा..!**



जनसेवेतुन राजकारणात स्वतःचं अस्तित्व निर्माण करणारा लोक संपर्कातला युवा नेता...सामाजिक व राजकीय क्षेत्रात निर्माण झालेल्या आपत्तीत राजकीय संधी हुकली. ज्यासाठी केला होता अट्टाहास...ते लक्ष्य गाठण्याची संधी मिळाली नाही..... परंतु परिस्थिती समोर हतबल न होता, संघर्षाची तयारी ठेवुन खंबीरपणे राजकीय परिघात पाय घट्ट रोवून उभे राहीले. आज ही उत्साह आणि उमेद कायम आहे. संघटन कौशल्य व प्रदिर्घ अनुभव लक्षात घेऊन पुन्हा जिल्हाध्यक्ष पदाची धुरा त्यांच्या कडे देण्यात आली. राजकारणातील धुरंदर नेते मा.शरद पवार साहेब यांच्या बहुआयामी नेतृत्वात काम करण्याची मिळलेली जबाबदारी अमुलाग्र बदलेल्या परिस्थितीत विस्कटलेली घडी सावरण्याची व नेतृत्व टिकवण्याची नियतीने दिलेली मोलाची संधी समजून नव्याने संघर्ष सुरू आहे. तो यशस्वी होणार. केवळ पद भुषवणे म्हणजे नेतृत्व नव्हे तर, ती एक महत्त्वाची जबाबदारी असतेमिळालेल्या पदाला सर्वंकष न्याय देण्यासाठी कायम धडपड करावी लागते. जनसंपर्क व जनसेवा कार्यात सातत्य टिकवून, जनतेच्या आशीर्वादाने कर्तबगार नेतृत्व सिद्ध होते.याची जाणीव ठेवून राजकीय प्रवास चालू आहे. आता पर्यंत मिळालेल्या प्रत्येक पदांना न्याय देवून लोकप्रियता टिकवली.पुर्व अनुभव लक्षात घेता राजेंद्र मस्के आणि अध्यक्ष पद हे जणु समीकरण निर्माण झाले आहे, असेच वाटते. पालवण- मराठा महासंघ शाखेचा अध्यक्ष पदापासून सुरू झालेल्या सार्वजनिक प्रवासात शिवसंग्राम युवा प्रदेश अध्यक्ष, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष, भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष आणि आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष. एका अर्थाने अध्यक्ष पर्वाचा राजकीय योग ते अनुभवत आहेत. सजगतेने जनतेच्या मनातील विश्वास अबाधित ठेवुन आहेत. एक कार्यकर्ता व अध्यक्ष म्हणून संघर्ष आणि त्यागातून जो समाजाभिमुख नेतृत्वाचा आदर्श निर्माण केला, तो खरंच कौतुकास्पद आहे. संघर्षासाठी सज्ज असणं कार्यकर्त्यांच कर्तव्य तर योग्य संधी मिळवणं नेतृत्वाच काम आहे. एकदिलाने पुढं जावु या.

हि वेळ ही जाणार आहे भविष्याच्या उदरात दडलेली संधी प्रकट होवुन जन आशीर्वादाने संधीच सोनं चमकणार आहे.

वाढदिवस निमित्ताने पुनःश्च एकदा शुभेच्छा सर्व मनोकामना पूर्ण होवोत.हि ईश्वर चरणी प्रार्थना...

*थोड़ा सब्र रखना, ये वक्त भी गुज़र जाएगा*
*जो आज अधुरा है, कल वही मुकम्मल हो जाएगा।*
*हर रात के बाद सुबह तो आती है,*
*संघर्ष की आग से ही सोना निखरकर आता है।*

**– आपला साथीदार**
**मारूतीराव तिपाले, बीड**

## खुशखबर! छत्रपती संभाजीनगर, नाशिक, बीडमध्ये म्हाडाच्या घरांसाठी लॉटरी

**मुंबई । प्रतिनिधी**

आपल्या हक्काचं घर असावं ही प्रत्येकाचीच इच्छा असते. मात्र या महागाईच्या काळात शहरांमध्ये घर घेणं अनेकांना परवडत नाही. अशा लोकांसाठी एक खुशखबर आहे. म्हाडाने नाशिक आणि संभाजीनगर विभागासाठी लॉटरी जाहीर केली आहे. या अंतर्गत छत्रपती संभाजीनगरमध्ये १३५१ घरे तर नाशिक विभागात १४८५ घरांसाठी लॉटरी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे अल्प उत्पन्न गट आणि मध्यम उत्पन्न गटातील लोकांसाठी केवळ ५ लाख किमतीपासून घरे उपलब्ध केली जाणार




आहेत. म्हाडाच्या या घरांसाठी ३० जून रोजी अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून त्यासाठीची शेवटची तारीख ही ११ ऑगस्ट आहे. म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करता येणार आहे.

नाशिक विभागात घरांची किंमत किती? नाशिकमध्ये एलआयजी म्हणजे अल्प उत्पन्न गटासाठी १२.६८ लाख ते १३.५५ लाख इतक्या किमतीत घरे उपलब्ध करुन दिली जाणार आहेत. वडाळा शिवारमधील पार्श्वनाथ प्रोजेक्ट या ठिकाणी ही घरे उपलब्ध असणार आहेत.

तसेच अडगाव शिवारमधील प्रणव गार्डनमध्येही अल्प उत्पन्न गटासाठी घरे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. त्याची किंमत ही ११.९४ लाख ते १५.३१ लाख इतकी असणार आहे.

अहिल्यानगरमधील सिव्हिल हुडको, सावेदी या ठिकाणी मध्यम उत्पन्न गटासाठी घरे उपलब्ध करुन दिली जाणार आहेत. या घरांची किमत ▶▶ उर्वरित पान २ वर

## गावठी पिस्टल घेऊन फिरणाऱ्या तिघांना शिवाजीनगर पोलिसांनी केले जेरबंद

### धानोरा रोड परिसरात कारवाई ; चार चाकी गाडीसह पिस्टल जप्त



**बीड । प्रतिनिधी**

शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील धानोरा रोड, बीड या ठिकाणी पांढ-या रंगाची ह्युडांई XCENT गाडी क्र. MH 05 BJ 1988 मध्ये दोन इसम अग्निशस्त्र ताब्यात बाळगुन घेवुन जात आहेत अशी गोपनीय माहिती शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांना मिळालेने सदर बातमीचे अनुषंगाने खात्री करुन कारवाईकामी तात्काळ पोलीस ठाणे स्थरावर पथक तयार करुन रवाना केले होते.

नमुद पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या बातमीप्रमाणे धानोरा रोडवरील पंढरी कॉलनी समोर सापळा रचुन थांबलेले असतांना पांढ-या रंगाची ह्युडांई XCENT गाडी क्र. MH 05 BJ 1988 आल्याने सदर गाडी अडवुन त्यामध्ये दोन इसम आमोल कल्याण पवार

▶▶ उर्वरित पान २ वर

## ज्ञानसाई अमृतेश्वर पायी दिंडीसोहळा: अमोल महाराज डोंगरे यांच्या सेवाभावाची अखंड परंपरा

**गेवराई । प्रतिनिधी**

वारकरी संप्रदायातील श्रद्धा, निष्ठा आणि सेवा यांचे उत्तम उदाहरण म्हणजे गेवराई तालुक्यातील काजळा येथील ह.भ.प. अमोल महाराज डोंगरे आहेत. मागील सलग ८ वर्षांपासून ते ज्ञानसाई अमृतेश्वर पायी दिंडीसोहळा यशस्वीरीत्या पार पाडत आहेत. आळंदी ते पंढरपूर या पवित्र मार्गावर, प्रत्येक मुक्कामात हरिपाठ, कीर्तन, भजन, मृदुंगाच्या निनादात आणि विठ्ठलनामाच्या गजरात, वारकऱ्यांचा हा दिंडी



**वारकरी संप्रदाय हा फक्त परंपरा नाही, तर तो जीवन जगण्याचा मार्ग देखील आहे. विठ्ठलाच्या भक्तीत तल्लीन होऊन पायी चालणे म्हणजे आत्मशुद्धीचा आणि सेवा-निष्ठेचा मार्ग आहे. मला या पवित्र कार्याची सेवा करण्याची संधी मिळणे, ही माझ्यासाठी विठ्ठलाची कृपा आहे. माऊलींच्या पालखीबरोबर वाटचाल करताना प्रत्येक पावलागणिक अनुभव येतो की, आपले जीवन कोणासाठी तरी, काहीतरी चांगले करण्यासाठी आहे.- अमोल महाराज डोंगरे. ज्ञानसाई अमृतेश्वर पायी दिंडी सोहळा**

सोहळा अखंड सुरु आहे.

या सोहळ्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये तांदळा, काजळा, कोळगाव, बंगालीपिंपळा यासारख्या पंधरा ते वीस गावांतील वारकरी मोठ्या संख्येने सहभागी होतात. आळंदीपासून पंढरपूरच्या वाटेवर, श्री माऊलींच्या पालखी सोहळ्यासोबत ही दिंडी चालत जाते. ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड प्रकरणाचा तपास आता वरिष्ठ महिला आयपीएस अधिकारी करणार; मुख्यमंत्र्यांची विधानसभेत घोषणा

### धनंजय मुंडे यांच्या मागणीला २४ तासातच यश

**प्रकरण अतिशय गंभीर, आरोपी आणि त्यांना आश्रय देणारे, कुणालाही सोडणार नाही :फडणवीस**

**मुंबई । प्रतिनिधी**

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी बीड शहरात घडलेल्या अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणी केलेल्या मागणीला राज्य सरकारने २४ तासातच मान्य केले असून, या संपूर्ण प्रकरणाचा तपास आता एका वरिष्ठ महिला आयपीएस दर्जाच्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (SIT) मार्फत केला जाणार असून, याबाबतची अधिकृत घोषणा राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळ सभागृहात केली आहे.

बीड येथे घडलेले प्रकरण अतिशय गंभीर व माणुसकीला आणि शिक्षकी पेशाला काळीमा फासणारे आहे. या प्रकरणात अशाच प्रकारे आणखी काही मुलींचे देखील लैंगिक शोषण झाल्याची शंका नाकारता येत नाही, त्यामुळे असे प्रकार घडलेल्या मुलींनी आता स्वतःहून समोर येऊन तक्रार द्यावी, या प्रकरणाचा संपूर्ण छडा लागावा, यातील दोषी व त्यांना मदत करणारे तसेच त्यांना राजकीय किंवा सामाजिक बळ देणारे हे कोण आहेत, ते निष्पन्न व्हावेत व त्यांना कठोर शिक्षा व्हावी, ही सरकारची व नवनियुक्त डखढ समितीची भूमिका असेल, दोषी असलेल्या कुणालाही सोडले जाणार नाही, असे स्पष्ट शब्दात देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. धनंजय मुंडे यांच्या सह आज सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार चेतन तुपे यांनीही आज हा मुद्दा विधानसभेत उपस्थित केला होता. दरम्यान या तपास पथकाला कालमर्यादा निश्चित करून दिली जाणार असून, त्यांनी दिलेल्या वेळेत तपास पूर्ण करणे बंधनकारक असणार आहे, असेही श्री फडणवीस म्हणाले. या घोषणेनंतर धनंजय मुंडे यांनी आपण केलेली म ागणी राज्य सरकारने २४ तासांच्या आत मान्य केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार तसेच उपुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले असून, या प्रकरणातील पीडितांना न्याय मिळेपर्यंत आपण हे प्रकरण लावून धरू असा निर्धार मुंडेंनी व्यक्त केला आहे.

## स्मार्ट अंगणवाड्या फक्त कागदावरच

### पावसाळ्यात गळक्या छिद्र पडलेल्या पत्र्यांचा निवारा तर पिण्याच्या पाणी व स्वच्छतागृहांची वानवा चिमुकल्यांची परवड सुरूच




**बीड । प्रतिनिधी**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महिला व बालकल्याण विकास विभागाच्या माध्यमातून अंगणवाडी योजना राबविण्यात येते.या योजनेंतर्गत अंगणवाडीतील शुन्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांचा भौतिक, शारीरिक आणि सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्याचे ध्येय आहे.या मुलांना पोषणयुक्त आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, आरोग्य शिक्षण, औपचारिक शालेय शिक्षण केंद्रातुन देण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र स्मार्ट अंगणवाडी कागदावरच राहिल्या असुन कंत्राटदार पोसण्यासाठी अनावश्यक गोष्टींवर भरमसाठ खर्च होत असतानाच मुलभूत सुविधा मलांना सुरक्षित निवारा,पिण्याचे शुद्ध पाणी, वीजपुरवठा तसेच दरवाजे, खिडक्या दुरूस्ती व

▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK

# लेकरांची 'विठूमाऊली'

'श्री विठ्ठल' अवघ्या महाराष्ट्राचे लाडके दैवत. श्री विठ्ठलाचे भक्त म्हणजेच वारकरी विठ्ठलाला 'माउली' संबोधतात. आई ज्याप्रमाणे बाळाच्या सर्व इच्छा पुरवते, त्याचे लाड करते आणि त्याची काळजीही घेते त्याप्रमाणे विठूमाऊली तिच्या भक्तांच्या समस्त इच्छा पुरवते. भक्तांवर येणारी संकटे परतवून लावते, प्रसंगी भक्ताच्या घरी जाऊन त्याची सेवाही करते. माऊलीच्या अशाच एका भक्ताची कथा संक्षिप्त स्वरूपात आज पाहणार आहोत.

निस्सीम भक्ती आणि पराकोटीच्या भावामुळे साक्षात विठ्ठलालाच बोलावून बंधनमुक्त करण्यास भाग पाडणाऱ्या संत सखुबाई वारकरी संप्रदायाच्या इतिहासात कायमच्या अजरामर झाल्या. कृष्णा नदीच्या काठावर कऱ्हाड या ठिकाणी पती आणि सासू-सासऱ्यांसह राहणाऱ्या सखुबाई भगवंताच्या भक्तीमध्ये सदैव लीन राहायच्या. सखूबाईंचे पती, सासू आणि सासरे या तिघांनाही सखूबाईची भगवत भक्ती रुचत नव्हती त्यामुळे ते तिघेही तिचा पुष्कळ छळ करत; मात्र या छळाला भगवंताची देणगी मानून त्या सर्व काही सहन करत असत. एकदा कृष्णा नदीकाठी सखू पाणी भरण्यासाठी गेल्या असता त्यांना पंढरीकडे निघालेली दिंडी दिसली. विठ्ठल दर्शनाच्या ओढीने त्याही दिंडीत सहभागी झाल्या. याविषयी त्यांच्या घरी कळताच त्यांच्या पतीने त्यांना मारहाण करत घरी आणले आणि घरात एका खुंटीला बांधून ठेवले. पंढरपूर यात्रा संपेपर्यंत त्यांना बांधून ठेवायचे, दोन सप्ताह काहीच खायला प्यायला द्यायचे नाही असे ठरवून तिघेही आपापल्या कामाला लागले. सखुना बांधलेला दोर इतका घट्ट होता कि काही दिवसांनी त्यांच्या शरीराला खड्डे पडू लागले. याही परिस्थितीत त्यांनी आर्त भावाने श्री विठ्ठलाला साद घातली , 'हे नाथा, या डोळ्यांनी तुझे एकदा जरी चरण पाहिले असते, तरी मी तात्काळ प्राण त्यागले असते. मी जशीही आहे तुझीच आहे, तूच मला या बंधनातून मुक्त कर' आर्त भावाने आळवलेली सखूची हाक थेट श्री विठ्ठलाच्या अंतःकरणापर्यंत पोहोचली. क्षणाचाही विलंब न करता भगवंताने सुंदर स्त्रीचे रूप घेतले आणि सखूकडे गेला. स्त्री रूपातील भगवंत सखूबाईंना म्हणाला, 'मी पंढरपूरला जात आहे तुला नाही जायचे का ?' यावर सखू उदगारल्या 'मी इथे बांधलेली आहे, माझ्यासारख्या पापिणीच्या नशिबात पंढरपूरची यात्रा कुठे ' यावर स्त्रीरूपातील भगवंत म्हणाला 'बाई मी तुझ्या पाठीशी आहे, तुझ्या जागी मी उभी राहते, माझ्या ऐवजी तू पंढरपूरला जा. असे म्हणून भगवंताने



तिच्या शरीराभोवती गुंडाळलेला केवळ दोरखंड मुक्त केला नाही, तर या भवसागरातून सखूबाईंना कायमचे बंधनमुक्त केले. १५ दिवस उपाशी राहिलेल्या सखू मृत पावल्या तर आपण संकटात येऊ या भीतीने तिचे नातेवाईक सखूबाईंचे रूप घेतलेल्या भगवंताचा दोरखंड सोडतात. पुढे सखूबाई येईपर्यंत सखूच्या जागी साक्षात श्री विठ्ठल सखूबाईंच्या पतीची आणि सासू सासऱ्यांची सेवा करतो. भगवंताच्या सहवासाने सखूच्या पतीच्या आणि सासू सासऱ्याच्या स्वभावात परिवर्तन होऊन त्यांच्या वर्तणुकीत पालट होतो.

भावाचा भुकेला असलेल्या भगवंताने भक्ताच्या घरी जाऊन भक्ताचीच सेवा केल्याची कितीतरी उदाहरणे संत चरित्रांत सापडतात. ज्याप्रमाणे सखूबाईंसाठी त्याने १५ दिवस स्वतःला बांधून घेतले, तिच्या पतीची आणि सासू सासऱ्यांची सेवा केली, त्याप्रमाणे त्याने जनाबाईसाठी धुणी धुतली , एकनाथांच्या घरी श्रीखंड्या बनून पाणी भरले आहे. अशी एक ना अनेक उदाहरणे आहेत. टाकीचे घाव सोसल्याशिवाय जसे दगडाला देवपण येत नाही तसे प्रतिकूल परिस्थीतिला सामोरे गेल्याशिवाय भक्ताच्या भक्तीची कसोटी लागत नाही. संतांची चरित्रे वाचल्यावर एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते ती म्हणजे सर्वच संतांनी जीवनात कितीही घनघोर संकट आले तरी भगवंताची साथ तिळमात्रही सोडली नाही. उलट या परिस्थितीत त्यांनी केवळ भगवंतालाच आळवले. मायेतील प्रलोभने त्यांनी कधी जवळ केली नाहीत. मी भगवंताचा आणि माझा केवळ आणि केवळ भगवंत याच उत्कट भावाने त्यांनी मनोभावे उपासना केली शेवटी भगवंतालाही न राहवून भक्ताच्या साहाय्याला धावून यावेच लागते. भगवंत जसा सखूबाईंना बंधनमुक्त करण्यासाठी आला, संत गोरा कुंभारांना त्यांचे बाळ जिवंत करण्यासाठी आला, संत तुकारामांना सदेह वैकुंठात नेण्यासाठी आला. ज्ञानेश्वरांसाठी रेड्यामुखी वेद वदवण्यासाठी आला तसा तो आपल्याही साहाय्यासाठी का धावून येणार नाही ? घरातील परिस्थिती अत्यंत प्रतिकूल असतानाही सखूबाईंनी विठ्ठलाची आराधना सोडली नाही. साधना करताना घरातून होणारा विरोध सहन करत आपणही भगवंताची मनोभावे साधना करतो का ? ज्या आर्ततेने सखूबाईंनी श्री विठ्ठलाला साद घातली त्या उत्कटनेने भगवंताला आपण आळवतो का ? पुंडलिकासाठी जो भगवंत गेली २८ युगे एका विटेवर उभा आहे तो भगवंत आपल्या आर्त हाकेसाठी का बरे धावून येणार नाही ?

पान १ वरून पुढे...

## लैंगिक अत्याचार...

आमदार संदीप क्षीरसागर यांनी पावसाळी अधिवेशनात मुंबई येथे केला आहे.

लैंगिक छळ प्रकरणात आमदार संदीप क्षीरसागर यांचे समर्थक असलेले उमाकिरण येथील खाजगी क्लासचे संचालक विजय पवार व प्रशांत खाटोकर या दोन शिक्षकांचा सरळ सहभाग असल्याचा आरोप पीडित अल्पवयीन मुलीकडून करण्यात आला होता. या प्रकरणाची गंभीरता पाहून जिल्हा पोलीस अधीक्षकांनी तात्काळ गुन्हा नोंद करण्याचे पोलिसांना सुचित केले. शिवाजीनगर पोलीस ठाण्यात पीडितेच्या जबाबावरून तात्काळ गुन्हा नोंद करण्यात आला यामध्ये पोस्क व इतर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले. बीड जिल्ह्यात या लैंगिक छळा विरोधात सामाजिक व राजकीय नागरिकांनी आक्रमक भूमिका घेतली. यामुळे काही काळ बीड शहरात तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. सर्व सामाजिक राजकीय व पालक वर्गातून बीड जिल्हा बंदच हाक देण्यात आली होती. मात्र पोलीस यंत्रणेने मांजरसुंबा येथे दोन्ही आरोपींना सकाळी चारच्या दरम्यान दुसऱ्याच दिवशी अटक केल्याने सर्व शहरातून पोलिसांचे कौतुक करण्यात आले. या प्रकरणातील दोन्ही आरोपींना दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणात आमदार संदीप क्षीरसागर हे शांतच होते मात्र डॉक्टर योगेश क्षीरसागर यांनी व यानंतर माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी थेट आमदार संदीप क्षीरसागर यांच्यावर बोट ठेवत आरोप लावले. यामुळे बीड जिल्ह्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापले. आतापर्यंत शांत भूमिका घेतलेले आमदार संदीप क्षीरसागर यांनी थेट धनंजय मुंडे यांचे नाव घेत दीडशे दिवस बेपत्ता नसल्याचे सांगत मसाजोग प्रकरण दुःख न झालेले धनंजय मुंडे यांना मंत्रिपद केल्याच्या दुःख झाले असल्याचे म्हणत या प्रकरणात योग्य तपास सुरू असून उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार यांना असले प्रकार चालत नसल्याचे सांगत या प्रकरणातील आरोपी माझ्या जवळचे असले तरीही पोलिसांनी योग्य दिशेने तपास सुरू ठेवलेला आहे. पीडित कुटुंबाची भेट घेणार होतो मात्र पावसाळी अधिवेशनामुळे मुंबई येथे आलो यानंतर बीडला गेल्यानंतर पीडित कुटुंबाची भेट घेणार असल्याचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी म्हटले असून आरोपी विजय पवार हे जवळचे असले तरीही पोलिसाच्या कारवाईत कोणताही अडथळा निर्माण केला नाही. आपण विरोधी बाकावर असून सत्ता पक्षातील आमदारांना व नेत्यांना मुख्यमंत्री फडवणीस व अजित पवार यांच्यावर विश्वास नाही का ? असा सवाल उपस्थित करत या प्रकरणात जलद तपास होऊन दूध का दूध व पाणी का पाणी लवकरच होईल. यावेळी त्यांनी सर्वच बीड जिल्ह्यातील नेत्यांना हातावर घेतले .

पान १ वरून पुढे...

## खुशखबर! छत्रपती...

ही फक्त ५.४८ लाख इतकी असणार आहेत.

छत्रपती संभाजीनगरमध्ये किती किंमत ?

छत्रपती संभाजीनगरमध्ये पंतप्रधान आवाज योजनेच्या अंतर्गत घरे उपलब्ध करुन दिली जाणार आहेत. त्या अंतर्गत नक्षत्रवाडीमध्ये १०५६ घरे असून त्याची किंमत ही १५.३० लाख रुपये इतकी आहे. चिखलठाणामध्ये १५८ घरे असून त्याची किंमत २७ लाख रुपये इतकी आहे. देवळाई या ठिकाणी १४ घरे असून त्याची किंमत ही १३.१९ लाख ते १६.१९ लाख इतकी आहे. आनंद पार्कमध्ये १८ घरे असून त्याची किंमत ४.८५ ते ६.२७ लाख इतकी आहे. चिखलठाणा या ठिकाणी ६ घरे असून त्याची किंमत ही ३४ लाख इतकी आहे. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाईमध्ये ९२ घरे असून त्याची किंमत ही १०.६५ लाख रुपये इतकी आहे. छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे जाहीर सोडत तीन घटकांमध्ये विभागण्यात आली आहे. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत १ हजार १४८ सदनिका, म्हाडा गृहनिर्माण योजनेअंतर्गत १६४ सदनिका,२० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत ३९ सदनिका/भूखंडांचा समावेश आहे. नाशिक मंडळातील २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील ६३ सदनिका व म्हाडा गृहनिर्माण योजनेतील ०४ सदनिकांचा सोडतीत समावेश आहे. या सोडतीत अत्यल्प उत्पन्न गटाकरिता ११४८ सदनिका, अल्प उत्पन्न गटाकरिता २६६ सदनिका, मध्यम उत्पन्न गटाकरिता ०४ सदनिकांचा समावेश आहे.

म्हाडाच्या घरांच्या अर्ज प्रक्रियेचा शुभारंभ ३० जूनला करण्यात आला. या घरांसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख ही ११ ऑगस्ट २०२५ आहे. तसेच १२ ऑगस्टपर्यंत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येणार आहे. यानंतर १८ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्जांची यादी प्रसिद्ध केली जाईल. २५ ऑगस्ट २०२५ रोजी अंतिम पात्र यादी जाहीर केली जाणार आहे. त्यामुळे हक्काचे घर घेऊ इच्छिणार्या अर्जदारांना ही सुवर्णसंधी आहे.

म्हाडाचे आवाहन- नूतन संगणकीय सोडत प्रणाली ही संपूर्णतः ऑनलाईन व पारदर्शक असून कोणत्याही प्रकारे मानवी हस्तक्षेपास वाव नाही. शिवाय या सदनिकांच्या विक्रीकरिता मंडळाने कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट नेमलेले नाही. त्यामुळे अर्जदाराने कोणत्याही त्रयस्थ /दलाल/ मध्यस्थ व्यक्तीच्या प्रलोभनांना बळी पडू नये. तसेच अशा प्रकारच्या गैरव्यवहारास अथवा फसवणुकीस मंडळ अथवा म्हाडा जबाबदार राहणार नाही. हक्काचे घर घेऊ इच्छिनार्या अर्जदारांना ही सुवर्णसंधी असून अधिकाधिक नागरिकांनी या सोडतीत सहभाग घ्यावा.

पान १ वरून पुढे...

## गावठी पिस्टल...

वय २९ वर्षे रा. घोडका राजुरी ता.जि. बीड ह.मु. बार्शी नाका, बाबुराव मन्मथ वैराळे वय ३३ वर्षे रा. कदमवाडी ता.जि. बीड मिळुन आले. त्यावेळी नमुद दोन्ही इसमांची अंगझडती घेतली असता अंगझडतीतइसम नामेबाबुराव मन्मथ वैराळे याच्या कमरेला एक गावठी बनावट लोखंडी पिस्टल ज्यास मॅग्जीन असलेला जु.वा. किं.५०,०००/- रु. असा मिळुन आल्याने सदरचा गावठी पिस्टल व गुन्ह्यात वापरलेली पांढ-या रंगाची ह्युडांई दउएछ्ढ गाडी क्र. चक०५ इग १९८८ जप्त करण्यात आली. आरोपीनां पिस्टल विक्री करनारा इसम ३) राहुल प्रकाश तुपे रा. आशा टॉकीज धानोरा रोड बीड यास त्याच्या राहते घरुन ताब्यात घेण्यात आले. नमुद आरोपी राहुल प्रकाश तुपे हा मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्या आदेशाने बीड जिल्हातुन तडीपार असुन त्यावर तो तडीपारीच्या काळात बीड जिल्हात मिळुन आल्याने त्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील आरोपी अमोल कल्याण पवार यांचे विरुध्द बीड जिल्ह्यातील वेगवेगळया पोलीस ठाणे येथे एकुण ०८ गुन्हे दाखल आहेत. तसेच आरोपी क्र. (२) बाबुराव मन्मथ वैराळे याचे विरुध्द जिल्ह्यातील वेगवेगळया पोलीस ठाणे येथे एकुण ०२ गुन्हे दाखल असुन आरोपी क्र.३) राहुल प्रकाश तुपे याच्यावर वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात एकुण ०७ गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपींवर दाखल असलेले गुन्हे हे गंभीर स्वरुपाचे शरीराविरुध्द चे गुन्हे तसेच अवैध शस्त्र बाळगने अशा प्रकारचे आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनित कॉंवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग, बीड कमलेश मिना साहेब, यांचे मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री. किशोर पवार, सपोनि / संदिप दुनगहु, सपोनि/ गजानन क्षिरसागर, ग्रे.पो.उप.नि./ अब्दुलखय्युम कुरेशी, पोहवा/१६६४ रविद्र आघाव, पोना/४७० ज्ञानेश्वर मराडे, पोशि/३०५ दिलीप राठोड, पोशि/६१७ अशोक राडकर, पोशि/२०७७ बाळु रहाडे, पोशि/९०४ लिंबाजी महानोर, पोशि/५११ अभिजीत सानप, पोशि/४८५ विलास कांदे यांनी केली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि/ज्ञानेश्वर धोत्रे हे करत आहेत.

## ज्ञानसाई अमृतेश्वर...

दररोजच्या मुक्कामाच्या ठिकाणी पारंपरिक कीर्तन, हरिपाठ, सामूहिक भजन, सांप्रदायिक गायन हे कार्यक्रम नियमितपणे होतात. यामध्ये वारकरी भक्त मोठ्या श्रद्धेने आणि निष्ठेने सहभाग घेतात. या संपूर्ण सोहळ्याचे नियोजन, राहण्याची व भोजनाची सोय, शिस्तबद्ध व्यवस्था, वारकऱ्यांच्या अडचणींची काळजी हे सर्व कार्य ह.भ.प. अमोल महाराज डोंगरे स्वतः जातीने लक्ष देऊन पार पाडतात. वारकऱ्यांची सेवा म्हणजेच

पान १ वरून पुढे...

विठ्ठलसेवा, हा त्यांच्या आयुष्याचा केंद्रबिंदू झाला आहे. त्यांच्या सेवेचे व भक्तीचे हे कार्य श्री नगदनारायण महाराज, सद्गुरू जोग महाराज, महादेव महाराज, भगवान बाबा, निगमानंद महाराज यांच्या कृपाशीर्वादाने आणि नारायणगडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज व उत्तराधिकारी संभाजी महाराज यांच्या आशीर्वादाने घडत आहे. रविवारी हि दिंडी माऊलींच्या पालखी सोहळ्यासोबत फलटण ते बरड असा पायी प्रवास करुन बरड येथे मुक्कामी होती. एकंदरीत, ज्ञानसाई अमृतेश्वर पायी दिंडीसोहळा हे केवळ एक धार्मिक यात्रा न राहता, ती एक अध्यात्मिक संस्कार शिबिर ठरत आहे. ह.भ.प. अमोल महाराज डोंगरे यांचा सेवाभाव, निष्ठा आणि कार्यकुशलता या दिंडीच्या यशामागील खरी प्रेरणा आहे, अशा प्रतिक्रिया दिंडीतील सहभागी वारकरी यांनी व्यक्त केल्या.

## स्मार्ट अंगणवाड्या...

स्वच्छतागृहांची वानवा असल्याचे आढळून येते. संबंधित प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांना प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदनाद्वारे मागणी केली होती. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला होता मात्र शासन आणि प्रशासन स्तरावर अद्याप याची अंमलबजावणी झाली नसुन प्रशासनाला याचे गांभीर्य दिसून येत नसल्याची खंत डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली.

स्मार्ट अंगणवाडीच्या दृष्टीने अत्यावश्यक ई लर्निंग सुविधा ज्यामध्ये एलईडी टीव्ही तसेच शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय म्हणून लावण्यात आलेले वाटर प्युरीफायर अंगणवाडी मध्ये वीजपुरवठाच नसल्याने धुळखात पडुन असुन केवळ कंत्राटदार पोसण्यासाठी अंगणवाडीला एलईडी टीव्ही आणि वाटर प्युरीफायरचा पुरवठा करण्यात आला आहे का ? असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

कुपोषण मुक्तीसाठी काम करणाऱ्या ग्रामीण भागातील १३०० अंगणवाड्या स्वतःची इमारत विना उघड्यावर झाडाखाली, समाज मंदिरात, पत्र्याच्या शेडमध्ये,किरायाच्या रूममध्ये भरतात. मराठवाड्यात मागील वर्षी ६३८ अंगणवाडी ईमारती मंजुर करण्यात आल्या होत्या.या इमारतींना मंजुरी दिल्यानंतर कामाचे कार्यारंभ आदेशही देण्यात आले होते.परंतु कंत्राटदारांनी या कामांना गती दिली नाही. एक वर्षापूर्वी मंजूर झालेल्या कामांची प्रगती केवळ १४.८९ टक्के आहे अर्थातच यात ४४२ कामे सुरू झाल्याचे कागदावर दाखविले जात असुन ९५ कामे तर अद्याप सुरुच झालेली नाहीत.या कामांसाठी शासनाने ३७.९६ कोटी रूपयांचा निधी मंजूर केलेला आहे.सदरील कामे रखडली असतानाही शासन स्तरावरून याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही हे विशेष.

पान ४ वरून पुढे...

## शासकीय कापुस...

विक्री करण्यासाठी कापसाची ई - पिक पाहणी करणे आवश्यक आहे ,सात - बारावर कापसाची नोंद असणे आवश्यक आहे,कापुस खरेदी सर्व पेमेंट आधार लिंक असलेल्या बँक खात्यात केले जाईल,त्याकरीता बँक खात्याला आधार लिंक करणे आवश्यक आहे,त्याचबरोबर आधार कार्ड ला मोबाईल नंबर लिंक करणे आवश्यक आहे. पोस्टल बँकेमध्ये खाते असल्यास त्याची पैसे स्विकारण्याची मर्यादा वाढवलेली आवश्यक असुन याची सर्व तयारी करावी तसेच नंतर ऐनवेळी धावपळ करण्यापेक्षा व परेशान होण्यापेक्षा रिकाम्या वेळात कापूस उत्पादक शेतकरी बांधवांनी हे काम करून ठेवा म्हणजे आपला कापुस शासकीय कापुस खरेदी केंद्रावर घालता येईल. त्यामुळे वरिल सर्व प्रक्रिया आताच पुर्ण कराव्यात असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाउ सवणे यांनी केले आहे.

## आईच्या वाढदिवसानिमित्त...

हा उपक्रम राबवला. पुढील काळातही असे उपक्रम सुरू ठेवण्याचा मानस आहे.या उपक्रमामुळे अनेक गरजूंना थोडा दिलासा मिळाला असून, प्रकाश जवळकर यांच्या सामाजिक जाणिवेचे सर्वत्र कौतुक होत आहे. वाढदिवस साजरा करण्याचा हा अनोखा आणि सेवाभावातून साकारलेला उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## वसंतराव नाईक...

शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय, गेवराई च्या 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागाच्या वतीने वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाभाऊ चव्हाण, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. शिवाजी दिवाण, उप प्राचार्य प्रा. डॉ. संगिता आहेर यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना ते म्हणाले की, वसंतराव नाईक यांनी प्रथम कृषीमंत्री व नंतर मुख्यमंत्री म्हणून काम करत असताना राज्यातील शेतकऱ्यांना उपयोगी ठरतील अशा विविध योजना राबविल्या.

पान ४ वरून पुढे...

कृषी विद्यापीठ स्थापन करुन आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत नेऊन महाराष्ट्रात हरितक्रांती घडवून आणली. कापूस एकाधिकार योजना, पाणी आडवा पाणी जिरवा, हरितक्रांती, धवल क्रांती यासारख्या योजना राबवल्या. म्हणून आजचा प्रगत महाराष्ट्र घडवू शकला आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. शिवाजी दिवाण यांनी केले. संचलन प्रा. डॉ. नामदेव शिनगारे यांनी तर कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. संगिता आहेर यांनी आभार मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व स्वयंसेविका यांची उपस्थिती होती.

## बीडमध्ये ज्येष्ठ ...

तसेच तरुण वयात जोपासता न आलेले छंद साकार करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी आपली नावे नोंदवावीत, त्यासाठी डॉ.दुष्यंत रामटेके ९७६७३५५२९४, डॉ.संजय पाटील देवळाणकर ९४२२२९५३१४, डॉ.राहुल सोनवणे ९८२२५७७६७१, डॉ.दीपक जमधाडे ८८८८८५०३५८, डॉ.अनिता शिंदे ७२७८३०५०५०, प्रा.विजय राख ९८३३३४५८०९, सुरेश थोरात ९४२२९११०९० यांच्याशी संपर्क करावा, असे संयोजकांनी म्हटले आहे.

## जिल्हा शल्यचिकित्सक...

पैसे घेण्याचा प्रकार करत असल्याचे उघडकीस आले आहे. जिल्हा रुग्णालयात गोरगरीब पेशंट उपचारासाठी आले असताना पेशंटच्या नातेवाईकाच्या माध्यमातून मदतीच्या बहाण्याने मुद्दामहून पैसे काढण्याची प्लॅनिंग करत गळ घालण्याचा प्रयत्न करतात. रुग्णांची लूट थांबवण्यासाठी सरकारी यंत्रणेने कठोर पाऊले उचलणे आवश्यक आहे. रुग्णांनी आणि त्यांच्या नातेवाईकांनीही जागरूक राहून, जास्त पैसे आकारले जात असल्यास तक्रार करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील नागरिकांना अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे. शासकीय रुग्णालयातील गर्दी आणि तेथील असुविधांमुळे सर्वसाधारण कुटुंबातील रुग्ण बीडच्या जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी जात आहे. मात्र येथे काही डॉक्टर व कर्मचारी

पान ४ वरून पुढे...

अतिरिक्त वसुली करीत आहे. एवढेच नाही तर, पैसे न दिल्यास रुग्णाला वेठीस धरण्याचा प्रकारही सुरु आहे. रुग्णालयातून एकदाचे मोकळे होण्यासाठी रुग्णांचे कुटुंबीय पैसे देऊन मोकळे होतात. दिवसेंदिवस हा प्रकार सर्रास सुरु असल्याने यावर निर्बंध घालणे गरजेचे आहे.

## पाठलाग करून...

गायकवाड, मोहन उर्फ राजु गायकवाड या दोघांसह अनोळखी चौघांवर बीड शहर पोलीस ठाण्यात जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणात बीड शहर ठाण्याचे पो.नि. बल्लाळ आणि त्यांच्या टीमने दिवसभर शहरातील प्रमुख रस्त्यावरचे सीसीटीव्ही फुटेज तपासून काही तासातच स्कॉपिओ गाडीसह हल्लेखोरांचा छडा लावला. गुन्ह्यात वापरलेली स्कॉपिओ गाडी जप्त करण्यात आली असून मोहन उर्फ राजु गायकवाड याला बेड्या ठोकल्या आहेत. एसपी साहेब, सर्वसामान्यांना त्रास देणाऱ्या गँगचा बंदोबस्त करा बीड शहर आणि परिसरात अश्याच काही गँगने प्रचंड दहशत निर्माण केलेली आहे. सर्वसामान्यांना त्रास देणाऱ्या या गँगचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे. त्यामुळे वेळीच त्याच्या मुसक्या आवळा अशी मागणी होवू लागली आहे. या प्रकरणी शेख अयाज शेख सलाउद्दीन यांच्या फिर्यादीवरून मोहन उर्फ राजु गायकवाड, परशुराम गायकवाड यांच्यासह अनोळखी चार अशा सहा जणांविरूध्द बीड शहर पोलीस ठाण्यात कलम १०९ (१), ३५१(३), ३५२, १२५ (ब) ३(५) बीएनएसप्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. सदरील घटना घडल्यानंतर पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. शितलकुमार बल्लाळ यांच्या टीमने पीएसआय कुमावत, सय्यद शहेंशाह, पोलीस अंमलदार राठोड, बावनकर, पवार यांनी सदरील स्कॉर्पिओचा शोध घेण्यासाठी सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यानंतर काही तासातच स्कॉर्पिओ क्रमांक .एम.एच.४४. के. २४०० जप्त करून मोहन उर्फ राजु गायकवाड याला गजाआड केले. या प्रकरणाचा पुढील तपास प्रभारी अधिकारी सपोनि राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.नि. कुमावत हे करीत आहेत.

पान ४ वरून पुढे...

## निरीक्षणगृह बीड...

त्यानंतर, निरीक्षणगृहाचे अधीक्षक मन्सुरी अन्सार निसार अहमद यांनी वसंतराव नाईक यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. 'हरितक्रांतीचे जनक' म्हणून ओळखले जाणारे वसंतराव नाईक यांनी कृषी, शिक्षण आणि सामाजिक समतेच्या क्षेत्रात दिलेल्या योगदानाचे महत्त्व त्यांनी मुलांना समजावून सांगितले. वसंतराव नाईक यांच्या विचारांना आत्मसात करून एक चांगला नागरिक बनण्याचे आवाहन मुलांना केले. हा कार्यक्रम निरीक्षणगृहातील मुलांमध्ये प्रेरणा आणि सकारात्मकता निर्माण करणारा होता यावेळी बालीका सिंधीकुमठे शिक्षीका,संकेत शिरोडे लिपीक,तौफीक शेख,,स्नेहा मस्के ,नितीन बडे,सुनिल चव्हाण,नदीम शेख,निहाल शेख,माधुरी शिंदे,पौर्णिमा कांबळे,कर्मचारी व बालके हजर होते.

## स्वराज्य जनजागृती...

हे सर्व विश्वस्त त्या त्या भागात प्रभावशाली रीतीने काम करत आहेत. त्यामुळे संघटनेची बांधणी प्रभावशाली रीतीने होईल. कार्यकर्त्यांना दिशा देण्यासाठी लवकरच विश्वस्त मंडळाची एक बैठक घेतली जाणार आहे. यानंतर कार्यकर्त्यांचे जिल्हास्तरीय मेळावे, बैठका आणि राज्यस्तरीय मेळावा याबाबत सर्व कार्यकर्त्यांशी विचारविनिमय करून निर्णय घेण्यात येणार आहे. चारित्र्य संपन्न, भ्रष्टाचाराचा कसलाही डाग नसलेला, स्वार्थ बाजूला ठेवून आदर्शाची कास धरून चालणारा आणि समाज हितासाठी वाहून घेणारा प्रामाणिक कार्यकर्ता जोडणे, हा आमचा उद्देश आहे. लोकशिक्षण आणि लोकजागृती ही सध्या आवश्यक आहे. समाजाचा आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी लोकशिक्षणाची गरज आहे. त्यामुळे लोकशिक्षण आणि लोक जागृती हा प्रमुख गाभा मानण्यात येणार आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, युवकांचे प्रश्न आणि समाजाला भेडसावणाऱ्या सर्व समस्या, समाजात शांतता अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्न करून समाज हिताचे काम करण्याची मनोमन इच्छा असणाऱ्या चांगल्या कार्यकर्त्यांचा शोध घेऊन असे कार्यकर्ते देखील नव्या संघटनेशी जोडण्यासाठी सर्व कार्यकर्ते प्रयत्न करणार आहेत. ॲड. अजित देशमुख आणि पदाधिकाऱ्यांवर या निमित्ताने शुभेच्छांच्या वर्षा होत आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# वसंतराव नाईक महाराष्ट्राचे भागीरथ: भागवत तावरे

### • केसके कृषी महाविद्यालयाकडून माळापुरीत कृषीदिन

**बीड । प्रतिनिधी**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (के.एस.के.) कृषि महाविद्यालय, बीड. आज दिनांक १ जुलै २०२५ रोजी सौ.के. एस.के. (काकू) कृषी महाविद्यालयातील कृषीदुतांनी वसंतराव नाईक यांची जयंती व कृषी दिनानिमित्त मौजे माळापूरी येथे वृक्षारोपण सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळेस लोक पत्रकार भागवत तावरे , सरपंच अशोक धास,उपसरपंच समीर बैग जगतगुरु माध्यमिक विद्यालय चे प्राचार्य जितेंद्र डोंगरे, जि. प.प्रा. शाळेचे शिक्षक अशोक सप्रे सर व इतर मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे सहसचिव डॉ. जी. व्ही. साळुंखे,



**• तावरेंच्या व्याख्यानात सलोखा कृषी आणि गुपिते**

**भागवत तावरे यांनी मुख्यमंत्री निवासाला वर्षा नाव वसंतराव नाईक यांनी दिल्याची रोचक माहिती दिली .महाराष्ट्राला अन्न धान्य स्वयंपूर्ण दोन वर्षात करील नाहीतर आत्महत्या करण्याची भीष्मप्रतिज्ञा करणारे मुख्यमंत्री नाईक होते .रोजगार हमी योजनेने गरिबांचे कल्याण तर नवी मुंबई विकसित करणारे सीएम अशी ओळख नव्याने झाली . महाराष्ट्राचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेले नाईक बंजारा समाजतुन येत होते तरीही कधी यावरून भेद झाला नाही हा आदर्श आम्ही पुढे न्यायचा असे आवाहन तावरे यांनी केले**

प्राचार्य डॉ. एस. पी. मोरे, कार्यक्रम समन्वयक प्रा. डॉ. एस.टी. शिंदे आणि उपक्रमाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. जी. पी. राऊत यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी कृषीदूत शिवराज पाटील, आदित्य वाडमारे, सुमित वांढरे, शुभम तकिक, ऋतुराज देशमुख, अमर पवळ आणि उके वामसी उपस्थित होते. कृषीदूतांनी दाखवलेल्या या सक्रिय सहभागामुळे कृषी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या योगदानाला प्रोत्साहन मिळाले आहे.

## बीड शहर बचाव मंचाच्या वतीने कृषी क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

हरितक्रांतीचे जनक तथा माजी मुख्यमंत्री वसंतराव जी नाईक यांची आज बीड शहर येथे संत भगवान बाबा चौक या ठिकाणी अर्धाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तसेच श्रद्धा भावाने अभिवादन करून बीड शहर बचाव मंचाच्या व व कर्मयोगी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्या अनुयायांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी त्यांच्या कृषी क्षेत्राशी निगडित कार्यावर मान्यवरांच्या वतीने प्रकाश टाकण्यात आला. त्यांनी हरितक्रांतीचे जनक म्हणून संपूर्ण जगात त्यांच्या कृषी व शेतकरी हिताच्या कार्यातून ओळख निर्माण केली. त्यामुळेच संपूर्ण महाराष्ट्र आज सुजलाम सुफलाम व स्वयंपूर्ण झाला आहे. त्यांची दूरदृष्टी हे महाराष्ट्राच्या हरितक्रांतीचे धोतक आहे. यावेळी बीड शहर बचाव मंचाच्या वतीने सर्व मान्यवरांनी वर्तमान तसेच पुढील काळामध्ये माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्या



विचारांवर वाटचाल करत त्यांनी दाखवलेल्या मार्गाने पावलावर पाऊल ठेवून महाराष्ट्राला कृषी व औद्योगिक विकासाच्या माध्यमातुन प्रगतीपथावर नेण्यात यशस्वी होऊ असा ठाम विश्वास व्यक्त केला. कृषी क्रांती जनक माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीच्या निमित्ताने,डी. जी. तांदळे सर ,नितीन जायभाये, ॲड.अनिल बारगजे, मा.भूषण पवार, मीनाक्षी देवकते, लताताई राऊत, चित्रपट अभिनेते ड.महेश कुमार वनवे, बाजीराव ढाकणे, अमोल अंकुटे, काँग्रेस पक्षाचे गणेश बजगुडे, रामधन जमाले, गवते सर,अशोक लोढा,मयुरी ताई ढाकणे, जिव्हाळा बेघर केंद्राचे राजाभाऊ वंजारे, छायाताई सरोदे, अभिजीत वैद्य, बालाजी जगतकर,डॉ. संजय तांदळे,बंजारा क्रां. दल रा.म.सचिव शरद राठोड, कॅप्टन जे.डी चव्हाण, जि.प सभापती बाबुराव जाधव, विलास राठोड अंकुश राठोड, परमेश्वर जाधव, सरपंच भाऊसाहेब राठोड, शरद राठोड, प्रभाकर राठोड, राजेश राठोड, अभय चव्हाण, विजय चव्हाण, अशोक चव्हाण, प्रीत कुकडेजा,अशोक लोढा ,SDPI पार्टीचे आबिदभाई सय्यद, अशोक वाघमारे आदी मान्यवर बहुसंख्येने उपस्थित होते.

## आपल्या धनसंपत्तीचा उपयोग मुला मुलींच्या शिक्षणासाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी करा : प्रा. डॉ .प्रदीप खडके

**माजलगाव । प्रतिनिधी**

आपल्याकडे उपलब्ध असलेल्या धनसंपत्तीचा उपयोग इतर व्यसन अंधश्रद्धा रूढी परंपरा या वाईट गोष्टीकडे न खर्च करता आपल्या मुलाबाळाच्या शिक्षणासाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी खर्च करा असे मत व्याख्याते प्रा. डॉ. प्रदीप खडके यांनी व्यक्त केले आहे.



मार्तंड बहुउद्देशीय सेवाभावी संस्था मल्हारी मार्तंड अर्बनच्या संयुक्त विद्यमाने माजलगाव येथील वैष्णवी मंगल कार्यालयात दिनांक ३० जुन २०२५ सोमवार रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती, धनगर समाज कौटुंबिक स्नेह मिलन, व अहिल्या रत्न पुरस्कार, गुणवंतांच्या आयोजित सत्कार समारंभात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते .या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्य बबनराव सरवदे तर उद्घाटक म्हणून शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले होते मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सभापती कल्याणराव आबुज, अँड राजेश शिंदे अण्णासाहेब मतकर प्राध्यापक भगवानराव माने संपतराव हराळ सुभाषराव गडदे अंकुशराव गाडगे विलास नेमाने ह भ प शिवाजी महाराज गडदे ह भ प रामदास हाके डॉ. भारत वाघमोडे डॉ. गणेश बाबरे , अंकुशराव येळे ,अँड आरती ताई कांडुरे सौ राधा येवले गीता गायके,सौ.प्रतिभा सोन्नर, डॉ .सौ.वाघमोडे,नारायण सातपुते नारायण भले राज अर्जुन आयोजक विशाल देवकते सौ संगीता देवकते उपस्थित होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली . या कार्यक्रमात आपल्या पतीच्या निधनानंतरही न डगमगता आपला संसाराचा गाडा ओढत आपल्या मुला-मुलींना उच्चशिक्षित करणाऱ्या ११ महिलांना अहिल्यारत्न पुरस्कार देऊन गौरव केला आणि समाजातील विविध क्षेत्रात गुण मिळवलेल्या गुणवंतांचा व शासकीय नोकरीत लागलेल्या मुला मुलींचा यावेळी हार पुष्पगुच्छ न देता झाड ट्रॉफी मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी पुढे बोलताना खडके म्हणाले की सध्याच्या वातावरणात आपण व्यसनापासून दूर राहावे अंधश्रद्धा रूढी परंपरा यामध्ये न गुरफटका आपल्या पैशाचा धनसंपत्तीचा उपयोग हा आपल्या मुला बाळाच्या शिक्षणासाठी आणि समाजाच्या प्रगतीसाठी करा आपल्या समाजामध्ये अनेक हिरे आहेत परंतु ते आपल्या घरच्या परिस्थितीमुळे इतरत्र दडलेले असतात परंतु समाजातील जे हुशार गरजूवंत विद्यार्थी आहेत त्यासाठी मी सर्व तोपरी त्या विद्यार्थ्यांच्या पाठीशी राहील असा विश्वास त्यांनी यावेळी दिला. या कार्यक्रमात मानपत्राचे वाचन बाळासाहेब सोनसळे यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राध्यापक लक्ष्मीकांत सोनार यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोविंद गोचडे लक्ष्मण सरोदे यांनी केले कार्यक्रमाचे आभार विशाल देवकते यांनी मानले या कार्यक्रमास महिला पुरुष विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड नगरपरिषद च्या विरोधात मनसेचे अनोखे आंदोलन खड्ड्यात बेशरम चे झाड लावून घोषणाबाजी

**बीड । प्रतिनिधी**



शहरातील जुना बाजार कोतवाली वेस ते बलभीम चौक,कारंजा रोड,राजुरी वेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत रस्त्याचा काम तात्काळ सुरू करण्यात यावा या मागणीसाठी आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने बीड नगरपरिषद च्या विरोधात जुना बाजार येथील रस्त्यावरील खड्ड्यात बेशरम चे झाड लावून अनोखे आंदोलन करण्यात आले.

बीड शहराच्या मध्ये भागातून जाणाऱ्या शहरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असणारा जुना बाजार कोतवाली वेस ते बलभीम चौक,कारंजा रोड राजुरी वेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पऱ्यांत रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असून रस्त्यावर मोठ - मोठाले खड्डे पडून सामान्य नागरिकांना रहदारीसाठी मोठा अडथळा येत आहे.शहरातील हा प्रमुख व्यापारी मार्ग असून दररोज या ठिकाणी जिल्हाभरातून नागरिक विविध व्यवसायाच्या निमित्ताने येतात तसेच अनेक दिवसापासून रस्त्याच्या कामाला प्रलंबित ठेवलेला असल्याने येथील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. बीड नगर परिषदेने येथील नागरिकांची पिळवणूक थांबून तात्काळ रस्त्याचा काम सुरू करावा अशी मागणी करत आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने वार्षताई जगदाळे (महिला आघाडी राज्य उपाध्यक्ष) यांच्या प्रमुख उपस्थितीत मनसे बीड शहराध्यक्ष पठाण अमरजान यांच्या नेतृत्वाखाली जुना बाजार येथील रस्त्यावरील खड्ड्यात बेशरम चे झाड लावून बीड नगरपरिषदेच्या विरोधात तीव्र व जोरदार घोषणाबाजी करत अनोखे आंदोलन करण्यात आले.यावेळी मनसेचे सदाशिव बिडवे (जिल्हा उपाध्यक्ष) आशा कुटे (बीड जिल्हाध्यक्ष),कल्पना कवठेकर (जिल्हा उपाध्यक्ष), सुरेखा ढाकणे,स्वराज मस्के,मोहम्मद सलीम,अब्दुल अजीम,तारेख चाऊस,रफिक शेख,मोमीन खादीर सह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होतेआदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संस्कारमध्ये 'कृषीदिन' उत्साहात संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

येथील संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली दुसरी विभागांमध्ये कृषीदिन उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाप्रसंगी लाभलेल्या विशेष वक्त्या विभागातील सहकारी शिक्षिका श्रीमती कुलकर्णी एस. एस. व वि. प्र. पारगांवकर ताई व्यासपीठावर उपस्थित होत्या . कृषीदिनानिमित्त हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतरावजी नाईक यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देण्यात आला. तसेच त्यांनी शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य व राबवलेल्या योजना तसेच कै. वसंतरावजी नाईक यांचा वैयक्तिक जीवन संघर्ष कार्यक्रमाच्या वक्त्या श्रीमती कुलकर्णी एस. एस .यांनी विद्यार्थ्यांसमोर प्रभावीपणे मांडला. या कार्यक्रमाप्रसंगी इयत्ता पहिली /दुसरी विभागातीलसर्व सर्व सहकारी शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते. श्रीमती खवले ताई यांनी कार्यक्रमाचे संचलन केले . त्याचबरोबर सांस्कृतिक वि.प्र. डोईफोडे ताई यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## खुनाच्या प्रकरणात ॲड. अविनाश गंडले यांच्या प्रभावी युक्तीवादामुळे दोन आरोपींची निर्दोष मुक्तता

### एक वर्ष सहा महिने अट्ठावीस दिवसांमध्ये आरोपींची निर्दोष मुक्तता

**बीड । प्रतिनिधी**

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, दि. ०१/०८/२०२५ रोजी फिर्यादी नितीन नारायण माने याने पोलिसांनी दिलेल्या माहिती आधारे ग्रामीण पोलीस स्टेशन बीड येथे तक्रार दिली की, चऱ्हाटा रोडवरील रेल्वे ब्रिजच्या खाली मृत अवस्थेत एक प्रेत पडलेला आहे. सदरील माहिती फिर्यादीस मिळाल्यानंतर तो महाबळेश्वर येथे असल्याने त्यांनी त्याच्या घरच्या नातेवाईकांना घटनास्थळी पाठवून शहानिशा केली असता सदरील मृतप्रेत हे फिर्यादीचा भाऊ नामे पांडुरंग उर्फ पप्प्या नारायण माने यांच्या आहे हे निष्पन्न झाले. घटनेच्या दिवशी फिर्यादी सोबत विकास वायकुळे व ओंकार लकडे हे दोघे असल्याने केवळ संशयावरून त्यांच्याविरोधात तक्रार दिली.

पोलिसांनी प्रकरणाचा तपास करून सदरील प्रकरणांमध्ये मा. जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे दोषारोपपत्र दाखल केले. त्यानंतर मा. न्यायालयात सेशन केस क्रमांक २१९/२०२३ हे प्रकरण करण्यात आले आरोपींच्या वतीने ॲड. अविनाश पं. गंडले यांनी तपासी अधिकाऱ्यासह एकूण १२ साक्षीदार तपासले. आरोपी पक्षाचा बचाव करतांना सातत्यपूर्ण पाठपुरावा, अभ्यासू युक्तिवाद तसेच आरोपींचा प्रस्तुत प्रकरणांमध्ये कसल्याही प्रकारचा सहभाग नसल्याचे ॲड. अविनाश पं. गंडले मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब बीड यांनी प्रस्तुत प्रकरणातील दोन्ही आरोपींची कोणताही सबळ पुरावा नसल्याने तसेच आरोपींवर आरोप सिद्ध न झाल्याने निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणाकडे बीड जिल्ह्यासह महाराष्ट्राचे लक्ष लागले होते.

केवळ एक वर्ष सहा महिने अठ्ठावीस दिवसांमध्ये आरोपींची निर्दोष मुक्तता केल्याने ॲड. अविनाश पं. गंडले यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. आरोपींच्या वतीने ॲड. अविनाश पं. गंडले यांनी काम पाहिले तर त्यांना या कमी ॲड. इम्रान पटेल, ॲड. गोवर्धन पायाळ, ॲड. तेजस नेहरकर, ॲड. नामदेव माने, ॲड. किरण मस्के, ॲड. सुरक्षा जावळे, ॲड. शुभम सरवदे, ॲड. सचिन गिरी, ॲड. राजेश शिंदे, ॲड. अनिकेत गंडले, आशुतोष गंडले, आदींनी सहकार्य केले.

## किसनराव हुलगे सरांना काम करून घेण्याची कला अवगत होती :श्रीकृष्ण देशमुख

### मुख्याध्यापक किसनराव हुलगे यांचा सेवानिवृत्ती चा कार्यक्रम संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**



शाळेचा किंवा संसारिक कुठलाही कामाचा भार जास्त झाला तरी कुणावरही न चिडचिड करता रागवता अत्यंत शांत संयमाने आणि कमी बोलून काम करून घेण्याची कला मुख्याध्यापक किसनराव हुलगे यांना अवगत होती ती काला शिक्षकांनी घ्यावी असे आव्हान आधीव्याख्याता डायट श्रीकिसन देशमुख यांनी केले आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा किट्टी आडगावचे मुख्याध्यापक किसनराव लक्ष्मणराव हुलगे वयोमानानुसार ते सेवानिवृत्त झाले आहेत त्यानिमित्त जिल्हा परिषद केंद्र सावरगाव यांच्या वतीने दिनांक २८ जून २०२५ रोजी सुखसागर हॉटेल येथे आयोजित केलेल्या सेवापूर्ती सत्कार समारंभात देशमुख बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय मुख्याध्यापक समाधान शिंदे होते तर मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले शिक्षक सहकारी पतसंस्थेचे चेअरमन रमेश राव फपाळ चेअरमन कपिल डोंगरे, चेअरमन विलासराव शेजुळ प्रल्हाद दळवी उपस्थित होते.

सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा चे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सेवानिवृत्त मुख्याध्यापक किसनराव हुलगे व त्यांच्या सुविध पत्नी सौ संगीता कोरडे यांचा सपत्नीक साडी कपडे शाल पुष्प पुष्पहार पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी तुकाराम येवले रमेश फपाळ समाधान शिंदे विलास शेजुळ भारत टाकणखार मुकुंद कदम प्रभाकर साळवे सौ वर्षा कोरडे विजया कोरडे अमर हुलगे यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केली या कार्यक्रमास मुख्याध्यापक पी व्ही शिंदे अशोक वाडेकर यांच्यासह सावरगाव केंद्रातील घटक शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षिका नातेवाईक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वीरभद्र स्वामी यांनी केले तर आभार प्रल्हाद दळवी यांनी मानले.

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि.बीड येथील २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ५३८/२०२५**

**सिंधु राधाकिसन सपकाळ व इतर वि निरंक**

ज्याअर्थी मयत नामे राधाकिसन हरिभाऊ सपकाळ रा. सुर्डी (बु) ता. गेवराई जि. बीड हे / हया दिनांक २७/०२/२०२० रोजी सुर्डी (बु) ता. गेवराई जि. बीड येथे त ५२ वर्षे, धंदा झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ सिंधु भ्र. राधाकिसन सपकाळ, वय - घरकाम रा. सुर्डी (बु) ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क. २ हरिभाऊ पि. राधाकिसन सपकाळ, वय - ३८ वर्षे, धंदा - शेती रा. सुर्डी (बु) ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. ३ ज्ञानेश्वर शेती रा. सुर्डी (बु) ता. गेवराई जि. बीड, पि. राधाकिसन सपकाळ, वय - ३६ वर्षे, धंदा - ३३ वर्षे, धंदा - शेती रा. सुर्डी अर्जदार क. ४ बाळासाहेब पि. राधाकिसन सपकाळ, वय - ३० वर्षे, धंदा (बु) ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. ५ मिना भ्र. लक्ष्मण कवडे, वय - शेती य. सुर्डी (बु) ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या व गैरअर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत राधाकिसन हरिभाऊ सपकाळ रा. सुर्डी (बु) ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०१/०७/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख ०७/०८/२०२५**
**(मार्फत –ॲड. एम. डी. धांडे, गेवराई)**

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**शिक्का**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, गेवराई**

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही. डी. गिते २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १००२/२०२५**

**सुबाबाई भ्र. राजाभाठ रिदि व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- १. सुबाबाई भ्र. राजाभाऊ शिंदे, वय-६८ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा.अंथरवण पिंपरी, ता. जि. बीड, २. तुकाराम पि. राजाभाऊ शिदि, वय - ४३ वर्षे, धंदा- शेती, रा. अंथरवण पिंपरी, ता. जि. बीड, ३. बाबु पि. राजाभाठ रिदि, वय-४३ वर्षे, धंदा शेती, रा. अंधरवण पिंपरी, ता. जि. बीड, ४. शिवकन्या भ्र पांडुरंग गोरे, वय-३८ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. दगडी शहजानपुर, ता. जि. बीड

(अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत राजेभाऊ साहेबराव शिंदे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत राजेभाठ साहेबराव शिंदे यांचा मृत्यु दिनांक ३०.०५.२०२५ रोजी मौजे अथरवण पिंपरी, ता. जि. बीड** येथे झाला असुन अर्जदार क ०१ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क २ व ३ हे मुले आहेत. तसेच अर्जदार क ४ हि विवाहीत मुलगी आहे. मयताचे आई वडील फार वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत राजेभाउ साहेबराव शिंदे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३० जुन २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १६ ऑगस्ट २०२५.

**(मार्फत- ॲड. वाय एस टेकाडे)**

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**शिक्का**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

दैनिक
● https://marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
बुधवार, दि.०२ जुलै २०२५ पान ४

## शासकीय कापुस विक्रीसाठी शेतक-यांनी तयारी करावी: सभापती जयदत्त नरवडे

माजलगाव । प्रतिनिधी



शासकीय कापुस खरेदी केंद्रावर कापुस विक्री करण्यासाठी शेतक-यांनी २०२५ - २६ या हंगामाकरीता सर्व कागदपत्रांसह तयारी करावी असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाउ सवणे यांनी केले आहे. सन २०२५ - २६ या कापूस हंगामाकरीता शासनाच्या हमीदराप्रमाणे सि. सी.आयच्या वतीने शासकीय कापुस खरेदी ८११० रूपये एवढा निश्चीत करण्यात आला आहे. शेतक-यांनी शासकीय कापुस खरेदी केंद्रावर कापुस ▶▶ उर्वरित पान २ वर

# समाजातील प्रत्येक घटकाला फायदा व्हावा असेच काम संस्थेने केले : माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

स्वर्गीय काकूंनी लावलेल्या लहान रोपट्याचे विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे या वृक्षाच्या छत्रछायेखाली तेव्हापासून हजारो कुटुंबांना आधार मिळाला आणि यापुढे मिळत राहील संस्थेने सर्व जाती धर्माला प्राधान्य दिल्यामुळेच या संस्थेत गुणवंत विद्यार्थी घडले आहेत सामाजिक बांधिलकी जोपासणारी ही संस्था समाजातील प्रत्येक घटकाला फायदा व्हावा असेच काम करत असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले आहे

येथील विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील महादेव जाधव यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते यावेळी माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती तर व्यासपीठावर



डॉ.लक्ष्मण जाधव, हरिभाऊ गायकवाड, शिक्षणाधिकारी विक्रम सारूक, नानासाहेब काकडे, हर्षद क्षीरसागर, सुभाष क्षीरसागर, उषाताई सरवदे, विजय सरवदे, सतिष काटे, मकबूलभाई, सुधाकर मिसाळ, एम.बी.सानप, मौलाना काझी महंमद, सहाय्यक प्रशासकिय अधिकारी योगेश पवार, किर्तीताई पांगारकर, इंजि. देशमाने आदी मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमात प्रास्ताविक आशा हंडिबाग यांनी केले तर लक्ष्मण जाधव, हरिभाऊ गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी बोलताना माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की,गेल्या ३५ वर्षे ज्ञानदानाचे काम करून संस्थेत प्रमाणिकपणे काम करणारे जाधव भटक्या विमुक्त समाजात जन्मलेला एक तरूण उच्च शिक्षण घेवून उत्तम काम करू शकतो आणि सेवा करू शकतो असे लोक संस्थेला मिळाले. शिवाजी पाटोळे याने स्व.काकूंपासून सेवा केली. संस्थेने सेवेत घेताना जात-पात, धर्म कधीच बघीतला नाही, गुणवान लोकांना संधी देवून संस्थेने गुणवान विद्यार्थी घडवले. शिक्षणाच्या क्षेत्रात मोठे बदल झाले आहेत हे बदल स्वीकारत छोट्या रोपट्याने वटवृक्षात रूपांतर केलं आहे. अनेक अडचणीवर मात करत सामाजिक बांधीलकी जोपासत संस्थेचा प्रत्येक समाज घटकाला फायदा व्हावा असा प्रयत्न राहीला. बीड जिल्हा संवेदनशील जिल्हा आहे.धार्मिक वृत्ती जोपासणात वसा आणि वारसा चालवणारा जिल्हा आहे.यावेळी शाळेचे उप मुख्याध्यापक बेगसर, मुख्य लिपिक सचिन भोज,पर्यवेक्षक अमरापुरकर पर्यवेक्षक प्रा.गाडेकर प्रा. सिध्देश्वर तसेच सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## आईच्या वाढदिवसानिमित्त मुलाचा माणुसकीचा झरा अनाथ मुलांना अन्नधान्य व कपडे वाटप करून केला वाढदिवस साजरा

पाटोदा । प्रतिनिधी

सौ.मंगल रामराव जवळकर यांच्या वाढदिवसा निमित्त त्यांच्या पुत्र प्रकाश जवळकर यांच्या वतीने पसायदान प्रकल्प, ढेकानमोह आणि जिव्हाळा प्रकल्प, बीड येथे अन्नधान्य व कपड्यांचे वाटप करण्यात आले.या उपक्रम ।अंतर्गत गरजू कुटुंबांना धान्य, कपडे आणि जीवनावश्यक वस्तू वितरित करण्यात आल्या. सामाजिक बांधिलकीतून हा उपक्रम राबवण्यात आला असून, त्याला स्थानिक ग्रामस्थ, कार्यकर्ते




आणि सामाजिक संस्थांचे सहकार्य लाभले. प्रकाश जवळकर यांनी यावेळी सांगितले की, आईच्या वाढदिवसानिमित्त समाजासाठी काही सकारात्मक करावे या हेतूने ▶▶ उर्वरित पान २ वर

## वसंतराव नाईक यांनी आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत नेण्याचे कार्य केले : प्रा. रामहरी काकडे

गेवराई । प्रतिनिधी

वसंतराव नाईक यांनी कृषीमंत्री व मुख्यमंत्री असताना शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून अनेक योजना राबवल्या. 'शेतकरी सुखी, तर देश सुखी' या विचारातून आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत नेऊन महाराष्ट्रात हरितक्रांती घडवून आणली. असे प्रतिपादन प्रा. रामहरी काकडे यांनी केले. ते महिला महाविद्यालय, गेवराई येथे वसंतराव नाईक जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख



पाहूणे म्हणून बोलत होते.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा जन्मदिवस हा 'कृषी दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त जय भवानी ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम

### डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून अ.भा.म. नाट्य परिषद, के.एस.के. महाविद्यालयाचा उपक्रम

बीड । प्रतिनिधी

ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यात आनंदाची रंगत निर्माण करण्यासाठी आणि त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देण्यासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची बीड शाखा व सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू महाविद्यालयातील नाट्यशास्त्र व संगीत विभागाच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी बीडमध्ये



येत्या दि.१७ जुलै रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या बीड शाखा अध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून ज्येष्ठ नागरिकांसाठी उपक्रमाचे दरवर्षी आयोजन केले जाते. यामध्ये गीत गायन, नृत्य, नाटिका, काव्यवाचन, स्टँडअप कॉमेडी आदी कार्यक्रमांचा समावेश असणार आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात आनंद निर्माण व्हावा, त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड: मा. श्री सतीश तोटावर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड पदावर रुजू झाले तसेच माननीय श्री समृत जाधव जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचा निरोप समारंभ प्रसंगी माननीय श्री सचिन घोडके उपनिबंधक सहकारी संस्था बीड, तसेच बन्सी अण्णा शिरसाठ, चेअरमन बीड जिल्हा मजूर फेडरेशन बीड श्री अशोक कदम सहाय्यक निबंधक सहकारी संस्था बीड सहकारी संस्था, बीड श्री ऋषिकेश कातळे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था धारूर, परळी, केज, श्री राधाकिशन मोठे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, शिरूर कासार, पाटोदा श्री दीपक पवळ सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, गेवराई आष्टी श्री सुरज जगदाळे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था माजलगाव श्री विकास जगदाळे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तुळजापूर, श्री बाळकृष्ण शिंदे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अहिल्यादेवी नगर तसेच जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.*

## जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत साहेब तुमच्या शैलीत परिचारिकांना समजून सांगा

**● बीड जिल्हा रुग्णालयात पेशंटच्या नातेवाईकांकडून लूट**



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील आरोग्य विभागाच्या दृष्टीने महत्त्वाचे असणारे बीड जिल्हा रुग्णालयातील परिचालिकांकडून प्रसूती व्यवस्थित करण्यासाठी पैशांची मागणी करण्यात येत आहे त्यावेळी महिला कर्मचारी पेशंटच्या नातेवाईकांकडून दोनशे रुपये घेतले जातात व प्रसूतीसाठी दिलेल्या ड्रेस चे पैसे घेतले जातात अशा पद्धतीने लूट केली जात असेल तर जिल्हा रुग्णालयाचा कारभार कसा असेल अशा संताप जनक प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

जिल्हा रुग्णालयात जबरदस्तीने पैसे उकळण्याचा प्रकार वारंवार घडत आहे हा प्रकार तात्काळ थांबायला हवा. गोरगरीब सामान्य नागरिक आपल्याला चांगली आरोग्य सेवा मिळावी या हेतूने हॉस्पिटलमध्ये दाखल होतात मात्र तेथील प्रसुती विभागातील कर्मचारी व परीचालकांकडून नातेवाईकांना दबाव टाकून ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड : रविंद्रजी चव्हाण यांची भारतीय जनता पार्टी पक्षाच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन करताना द्वारकाधीश भवन धोंडीपुरा बीड .*

## पाठलाग करून स्कॉर्पिओने उडवणारे पोलिसांच्या ताब्यात

### पो. निरीक्षक बल्लाळ यांच्या जलद कारवाईमुळे काही तासांत वाहनासह एकास अटक

बीड । प्रतिनिधी

आमच्या गाडीला कट का मारला ? या कारणावरून स्कॉर्पिओतून पाठलाग करत स्टेडियम जवळ गायकवाड याच्या टोळीने स्कुटीवरील दोन युवकांना जिवे मारण्याच्या उद्देशाने उडविल्याचा प्रकार रविवार दि. २९ जुन रोजी पहाटे २.१५ ते २.४५ च्या सुमारास घडला. यामध्ये दोन्ही युवक गंभीर जखमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक



आहे. या प्रकरणात परशुराम ▶▶ उर्वरित पान २ वर

## निरीक्षणगृह बीड येथे वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

बीड येथील निरीक्षणगृहात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन महिला व बालविकास निरीक्षणगृहातील अधिकारी मन्सुरी अन्सार निसार अहमद आणि कर्मचाऱ्यांनी केले होते, ज्यात निरीक्षणगृहातील मुलांनीही सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून



करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आणि कर्मचाऱ्यांनी त्यांना आदरांजली वाहिली. ▶▶ उर्वरित पान २ वर

## स्वराज्य जनजागृती परिषदेच्या माध्यमातून लोक शिक्षण, लोकजागृतीसाठी प्रयत्न करणार : अध्यक्ष ॲड. अजित देशमुख

### नवीन संघटनेची स्थापना

बीड । प्रतिनिधी

स्वराज्य जनजागृती परिषद या नवीन संघटनेची स्थापना करण्यात आली आहे. या संघटनेच्या माध्यमातून आता कानाकोपऱ्यात लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. लोकशिक्षण आणि लोकजागृती हा संघटनेचा मूळ गाभा असून जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि आवाज उठवण्यासाठी संस्था काम करेल. व्यक्तीला नव्हे तर व्यवस्थेला विरोध हे गेल्या तीस वर्षापासूनचे धोरण कायम असणार आहे, असे स्वराज्य जनजागृती परिषदेचे नवनियुक्त अध्यक्ष ॲड. अजित



एम. देशमुख यांनी म्हटले आहे.

ज्येष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन ही चळवळ बरखास्त करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवरील सर्व शाखा बरखास्त करण्यात आल्या. मात्र आजही विश्वस्त म्हणून ॲड. अजित देशमुख व इतर या जन आंदोलनात अण्णांसह आहेत. गेल्या वीस - पंचवीस वर्षांपासून जन आंदोलनाच्या माध्यमातून हजारो कार्यकर्ते जोडले गेलेले आहेत. या कार्यकर्त्यांच्या मागणीवरून हे संघटन स्थापन करण्यात आले आहे. नवीन संघटन स्थापन झाल्यानंतर त्या संघटनेला कार्यकर्त्यांची वानवा असते. मात्र स्वराज्य जनजागृती परिषद स्थापन होण्यापूर्वीपासूनच हजारो कार्यकर्ते जोडले गेले आहेत. त्यामुळे परिषदेचे काम मोठ्या प्रमाणात होणार आहे.

स्वराज्य जन आंदोलन परिषदेचे अध्यक्ष म्हणून ॲड. अजित एम, देशमुख (बीड), उपाध्यक्ष म्हणून संदीप विठ्ठल जगताप (सातारा), सचिव तुषार अच्युतराव पाटील (कुर्ला), सहसचिव अरुण मोहन बोबडे (धाराशिव), कोषाध्यक्ष शिवाजी बबन खेडकर (पुणे), तर सदस्य म्हणून विष्णू भगवान ढवळे (छत्रपती संभाजीनगर) आणि गोवर्धन विठ्ठलराव मस्के (बीड) हे या संघटनेत विश्वस्त म्हणून काम काज पाहणार आहेत. संघटनेची पायाभरणी करताना अनेक विभागातून विश्वस्त घेण्यात आले आहेत. ▶▶ उर्वरित पान २ वर

